मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून विविध उपाययोजना

**पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे नमुने पाणीपुरवठा विभागाकडून घेतले जात आहेत : विहीर आणि टँकरचे पाणी केवळ वापरासाठी उपयोगात आणण्याच्या सूचना**

**पिंपरी | प्रतिनिधी**

दूषित पाण्यामुळे गुलेन बॅरी सिंड्रोमचा (जीबीएस) होत असलेला प्रादुर्भाव लक्षात घेता पिंपरी-चिंचवड महापालिका वैद्यकीय आणि पाणीपुरवठा विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. नळाद्वारे, टँकरद्वारे तसेच जारद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे नमुने पाणीपुरवठा विभागाकडून घेतले जात आहेत.

.टँकरचालकांना पाणीपुरवठा विभागाकडून ब्लिचींग पावडर दिली असून त्यांना ती पाण्यामध्ये टाकण्यास सांगितली आहे. टँकरचे पाणी पिण्यासाठी न वापरता वापरासाठी असल्याचे बोर्ड टँकरला लावण्याबाबत सांगण्यात आले आहे, विहीर आणि टँकरचे पाणी केवळ वापरासाठी उपयोगात आणण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आल्या आहेत. टँकरद्वारे पुरविण्यात येणारे पाणी पिण्यासाठी नसल्याचा बोर्ड संबंधितांना लावण्यास सांगण्यात आले आहे. तथापि, शहरामध्ये टँकर, जार यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सर्व पाण्याचे नमुने पाणीपुरवठा विभागाला घेणे शक्य होत नसल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे.

शहरामध्ये जीबीएसच्या एकूण 15 संशयित रुग्णांपैकी 6 रुग्ण बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. तर, जीबीएस बाधित 36 वर्षीय तरुणाचा महापालिकेच्या पिंपरी - संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तथापि, न्यूमोनियामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे कारण वायसीएम रुग्णालयाच्या तज्ज्ञ समितीने दिले आहे.



### पाणीपुरवठा विभागाच्या उपाययोजना

» पाणीपुरवठा विभागाकडून चऱ्होली, मोशी, डुडूळगाव, पिंपळे गुरव अशा विविध भागांमध्ये पाण्याचे नमुने घेतले जात आहेत.पिण्याच्या पाण्याचे आत्तापर्यंत एकूण 1661 नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. विहीरीतून टँकरमध्ये भरण्यात येणाऱ्या पाण्याच्या ठिकाणांवर आत्तापर्यंत 41 नमुने घेतले आहेत. पाण्याचे जार जिथे भरलेले जातात त्या केंद्रांवर एकूण 20 ठिकाणी पाण्याचे नमुने घेतले आहेत. टँकरचालकांना पाणीपुरवठा विभागाकडून ब्लिचींग पावडर दिली असून त्यांना ती पाण्यामध्ये टाकण्यास सांगितली आहे. टँकरचे पाणी पिण्यासाठी न वापरता वापरासाठी असल्याचे बोर्ड टँकरला लावण्याबाबत सांगण्यात आले आहे, अशी माहिती महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी दिली.

### वैद्यकीय विभागाच्या उपाययोजना

» सर्वेक्षणासाठी 8 रुग्णालय झोन अंतर्गत एकूण 16 पथके तैनात

» पथकांमार्फत 10 हजार 718 घरे तपासण्यात आली. त्यामध्ये नव्याने एकही जीबीएसबाधित रुग्ण आढळलेला नाही.

» या आजारावर उपचारासाठी आवश्यक औषधोपचार महापालिकेच्या पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह अन्य महापलिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

» या आजाराचे एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत समाविष्ट आहे. वायसीएम आणि नवीन थेरगाव रुग्णालयात या योजनेतंर्गत संबंधित रुग्णांसाठी मोफत उपचाराची सोय उपलब्ध आहे.


# प्राधिकरण परिसरात शिरलेल्या बिबट्याला जेरबंद करण्यात रेस्क्यू टीमला यश

**प्राधिकरण येथील संत कबीर उद्यान परिसरात दोन बिबटे दिसल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला होता.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील प्राधिकरण, निगडी येथील संत कबीर उद्यान परिसरात बिबट्याने शिरकाव केला होता. लोकवस्तीत शिरलेल्या या बिबट्याला तब्बल अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर जेरबंद करण्यात रेस्क्यू टीमला यश आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील प्राधिकरण, निगडी येथील संत कबीर उद्यान परिसरात बिबट्यांनी शिरकाव केल्याचा दावा स्थानिकांनी केला होता. प्राधिकरण येथील संत कबीर उद्यान परिसरात एक नव्हे तर दोन बिबटे दिसल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला होता. मात्र या परिसरात एकच बिबट्या आढळून आला आहे. सुरुवातीला या ठिकाणच्या एका बंगल्यात हा बिबट्या आढळून आला होता. त्यानंतर त्याने शेजारीच असलेल्या संत कबीर उद्यानात धाव घेतली. तेथे एका शेडमध्ये तो लपून राहिला होता.





दरम्यान बिबट्याला जेरबंद करण्याकरिता वनविभागासह रेस्क्यू टीम देखील या ठिकाणी दाखल झाली होती. परिसरात घबराटीचे वातावरण पसरले होते. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी युद्धपातळीवर कार्य सुरू होते त्यांनी तब्बल अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर या बिबट्याला बेशुद्ध करून जेरबंद केले आहे 2006 मध्ये पण पिंपरी चिंचवड शहरात बिबट्या आला होता.

# वेळ पाळा, तरच पूर्ण वेतन! महापालिका कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार

## विविध विभागांतील कर्मचारी-अधिकारी कार्यालयात वेळेवर हजर राहत नसल्याच्या तक्रारी महापालिका आयुक्त कार्यालयाकडे करण्यात आल्या आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी-अधिकारी कार्यालयात वेळेवर हजर राहत नसल्याच्या तक्रारी महापालिका आयुक्त कार्यालयाकडे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे वेळेवर कार्यालयात हजर नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात होणार आहे. यासाठी महापालिका कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेच्या ज्या कार्यालयात काम नेमून दिले आहे, त्यासाठी वेळेत हजर राहावे, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अनेकदा केल्या आहेत. मात्र, वारंवार सूचना देऊनही महापालिकेतील अनेक अधिकारी, तसेच कर्मचारी कामाच्या वेळेत कार्यालयातून गायब असल्याचे दिसले आहे. याची गंभीर दखल घेऊन या पुढील काळात कर्मचाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसारच देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.



### असा केला जातो कामचुकारपणा...

» महापालिका कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा आहे. त्यानुसार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कामाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. जेवणासाठी दुपारी २ ते २.३० वेळ आहे. मात्र, अनेक जण कार्यालयात सकाळी ११ वाजेपर्यंत येतात, तर सायंकाळी साडेपाच वाजताच कार्यालयातून घरी जातात. हे कर्मचारी बायोमेट्रिक नोंद न करता हजेरी पुस्तकात सह्या करतात.

### 'नुसत्या सहीवर वेतन नाही'

» 'हजेरी पुस्तकामध्ये वेळेची नोंद होत नसल्याने नुसत्या सह्यांवर संबंधित कर्मचारी आणि अधिकाऱ्याचे वेतन निघते. मात्र, यापुढील काळात हजेरी पुस्तकानुसार उपस्थिती गृहीत धरून वेतन काढले जाणार नाही. संबंधित कर्मचारी आणि अधिकारी यांच्या बायोमेट्रिक हजेरीची तपासणी करून त्यानंतरच त्यांचे वेतन दिले जाणार आहे,' असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले..

बायोमेट्रिक हजेरी न तपासताच वेतन दिले गेल्याचे आढळल्यास संबंधित विभागाच्या प्रमुखांवरदेखील कडक कारवाई केली जाणार असल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी यांनी सांगितले.कार्यालयात काम नेमून दिले आहे, त्यासाठी वेळेत हजर राहावे, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अनेकदा केल्या आहेत. मात्र, वारंवार सूचना देऊनही महापालिकेतील अनेक अधिकारी, तसेच कर्मचारी कामाच्या वेळेत कार्यालयातून गायब असल्याचे दिसले आहे. त्यामुळे वेळेवर कार्यालयात हजर नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात होणार आहे. यासाठी महापालिका कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वेळेवर कार्यालयात हजर नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात होणार आहे

# हडपसरला नवीन मेट्रो मार्गिका, मुख्य शहराशी कनेक्टिव्हिटी मिळणार असल्याने प्रवास होणार वेगवान...

## नवीन मेट्रो मार्गिकांमुळे हडपसर मतदारसंघात मेट्रो जाळे पसरणार असल्याने नागरिकांना प्रवास सुखकर आणि वेगाने होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन मेट्रो मार्गिकांमुळे हडपसर मतदारसंघात मेट्रो जाळे पसरणार असल्याने नागरिकांना प्रवास सुखकर आणि वेगाने होणार असल्याचा दावा या मतदार संघाचे आमदार चेतन तुपे यांनी केला आहे.

हडपसर विधानसभा मतदारसंघात सिव्हील कोर्ट ते कोंढवा बुद्रुक व खुर्द, येवलेवाडी मेट्रो मार्गास मंजुरी मिळाली आहे. तसेच हडपसर सासवड रोड, हडपसर लोणी काळभोर देखील मार्गिका मंजूर झाल्या आहेत. या मार्गामुळे हडपसरमधून मुख्य शहरासाठी कनेक्टिव्हिटी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या नवीन मेट्रो मार्गिकांमुळे हडपसर मतदारसंघात मेट्रो जाळे पसरणार असल्याने नागरिकांना प्रवास सुखकर आणि वेगाने होणार असल्याचा दावा या मतदार संघाचे आमदार चेतन तुपे यांनी केला आहे.



### पुणे मेट्रो फेज 2 प्रकल्प

» पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटीने पुणे मेट्रो स्टेशन प्रकल्प - शिवाजीनगर ते लोणी काळभोर आणि खडकवासला ते खराडी पर्यंत विस्तारित करण्याची योजना आखली आहे. पुणे मेट्रो फेज २ प्रकल्पांतर्गत इतर विविध मार्गांनाही मंजुरी देण्यात आली आहे. शिवाजीनगर ते लोणी काळभोर: पीएमआरडीए हिंजवडी ते पुण्यातील शिवाजीनगर मेट्रो स्थानकापर्यंत विस्तारित करणार असून, या मार्गाचा लोणी काळभोरपर्यंत विस्तार करण्याची योजना आहे. प्रस्तावित विस्तारित मार्गामध्ये सासवड रोडवरील संभाव्य शाखा असलेल्या शिवाजीनगर, पुलगेट, हडपसर आणि लोणी काळभोर यासह अनेक महत्वाच्या ठिकाणांचा समावेश असणार आहे. पहिल्या टप्प्यात हिंजवडी ते शिवाजीनगर आणि त्यानंतर लोणी काळभोरपर्यंतचा विस्तार टप्प्याटप्प्याने पूर्ण केला जाणार आहे.

विधानभवन येथील झुंबर हॉलमध्ये महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशनची बैठक पार पडली. पुणे शहराचा एकत्रित वाहतूक आराखडा बनवण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात सुरू आहे. याच संदर्भात या आराखड्यामध्ये नवीन मेट्रो मार्ग व त्याची व्यवहार्यता यासंबंधी शक्यतांचा विचार करत शहरात येत्या काही वर्षात कशाप्रकारे वाहतूक वाढ होईल व ती कोणत्या भागांमध्ये असेल अशा एकूण माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

याबाबत आराखड्याचे सादरीकरण बैठकीत करण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेत तुपे सहभागी झाले. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार हडपसरसाठी नवीन मेट्रो मार्गिका मंजूर झाल्या. त्यामुळे तुपे यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

तुपे म्हणाले की, पुलगेट ते कात्रज आणि हडपसर ते सासवड अशा दोन मार्गिका वाहतूक आराखड्यासाठी सुचविण्यात आल्या होत्या. कात्रज ते कोंढवा बु, खडी मशीन चौक, कोंढवा खुर्द, लुला नगर मार्गे पुलगेट असे असा मार्ग असेल. तर हडपसर ते लोणीकाळभोर, हडपसर ते सासवड रस्ता, फुरसुंगी स्टेशन पर्यंत मार्ग असणार आहे. शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मेट्रो मार्गिकांमुळे खडकवासला ते लोणीकाळभोर, कात्रज, हडपसर मार्गे खराडी तर दुसरीकडे सासवड रोड (फुरसुंगी) पर्यंत कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

मतदारांना निवडकीच्या वेळी मतदारसंघात मेट्रोचे जाळे निर्माण केले जाईल, असे वचन दिले होते. ते आता पूर्ण होताना दिसून येत आहे. बैठकीत केलेल्या सूचना मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता नवीन मार्गिकांसह मेट्रो जाळे निर्माण होऊन हडपसरकरांचा प्रवास सुखकर आणि वेगवान होणार आहे. असे तुपे यांनी सांगितले.

# अनधिकृत बांधकामे काढण्यासाठी व्यावसायिकांना सहा दिवसांची मुदत

## चिखली, कुदळवाडीतील व्यावसायिकांच्या वाढत्या विरोधानंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढून घेण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, कुदळवाडीतील व्यावसायिकांच्या वाढत्या विरोधानंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढून घेण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली आहे. सात फेब्रुवारीपासून पुन्हा कारवाईला सुरुवात केली जाईल, असा पवित्रा महापालिकेने घेतला आहे. दुसरीकडे ही कारवाई होऊ नये, यासाठी व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदाम तसेच, हॉटेल, बेकरी, पत्राशेड, वर्कशॉप अशा अनधिकृत असलेल्या पाच हजार अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा दिल्या होत्या. १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर अनधिकृत गोदामे, पत्राशेड, बांधकामे हटवण्यासाठी गुरुवारी (३० जानेवारी) महापालिकेचे पथक गेले होते. मात्र, या कारवाईविरोधात व्यावसायिक रस्त्यावर उतरले. त्यामुळे कारवाई न करताच महापालिकेचे पथक माघारी परतले. शुक्रवारी ( ३१ जानेवारी) कारवाई होऊ नये, यासाठी सुमारे चार हजारपेक्षा जास्त व्यावसायिकांनी एकत्र येऊन कुदळवाडीत रस्त्यावरच बैठक घेतली. पोलिसांनी व्यावसायिकांची समजूत घालून महापालिकेत बैठकीसाठी प्रतिनिधींनी यावे, अशी विनंती केली.

व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ दुपारी महापालिकेत पोहचले. मध्यवर्ती अतिक्रमणविरोधी विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांच्या दालनात बैठक झाली. यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, पोलिस उपायुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, इतर अधिकारी तसेच, कुदळवाडीतील व्यावसायिकांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह याच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार कुदळवाडीतील व्यावसायिकांना सात दिवसांची मुदत देण्यात येईल. ती मुदत 6 फेबुरवारीपर्यंत आहे. त्यानंतर 7 फेबुरवारीपासून महापालिकेकडून सरसकट कारवाई करण्यात येईल, असे असे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले; मात्र व्यावसायिकांनी सहा महिन्यांची मुदत मागितली. त्या मागणीस पालिका प्रशासनाकडून स्पष्ट नकार देण्यात आला.

त्यानंतर महापालिकेत शहर अभियंता मकरंद निकम, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर, 'क' क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे आणि व्यावसायिकांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. या बैठकीतही व्यावसायिकांनी तूर्त अतिक्रमण कारवाई करू नये, आम्हाला सहा महिन्यांची मुदत द्यावी, अशी मागणी केली. मात्र, महापालिका अधिकारी यांनी सहा दिवस कारवाईला स्थगिती दिली. सात फेब्रुवारीपासून अतिक्रमणांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट सांगितले.



### सरसकट कारवाई मोहीम राबविली जाणार

» चिखली येथील कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील अनधिकृत भंगार दुकाने व गोदामावर कारवाई मोहीम त करण्यात आली आहे. या मुदतीमध्ये अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या मध्यवर्ती अतिक्रमण विरोधी विभागाने केले आहे; मात्र त्यानंतर सरसकट कारवाई मोहीम राबविली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### व्यावसायिक उच्च न्यायालयात

» अतिक्रमण कारवाईविरोधात व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकांवर १४ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. असे असतानाच ३० जानेवारी रोजी व्यावसायिकांनी ४८ याचिका दाखल केल्या आहेत. व्यावसायिकांबरोबर बैठक झाली. अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली आहे. मुदत संपल्यानंतर सात फेब्रुवारीपासून कारवाई सुरू केली जाईल. सद्यस्थितीत आरक्षित जागेच्या अतिक्रमणांवरील कारवाई सुरूच राहणार असल्याचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.

# शिधापत्रिकाधारकांचे केवायसी रखडले; चाळीस टक्के शिधापत्रिकाधारकांचे काम अपूर्ण

## शहरातील जवळच्या स्वस्तं धान्य दुकानात जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

धान्य हवे असल्यास शासनाने दिलेल्या मुदतीत केवायसी (नो युवर कस्टमर) करून घेण्याचे आवाहन अन्न धान्य वितरण व पुरवठा कार्यालयाने केले आहे. त्यानुसार शहरातील जवळच्या स्वस्त धान्य दुकानात जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. शहरात तीनही कार्यालयांतर्गत एकूण सुमारे साडेतीन लाख शिधापत्रिकाधारक आहेत. या पैकी आतापर्यंत ६१ शिधापत्रिकाधारकांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झाली असून उर्वरित ३९ टक्के शिधापत्रिकाधारकांची प्रक्रिया अद्याप शिल्लक आहे. दुकानचालकांकडून ही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्र राज्याबाहेरील नागरिक जवळच्या स्वस्त धान्य दुकानदारांकडे जाऊन केवायसी करत आहेत. मात्र त्यांच्या अंगठ्याचे ठसे उमटत नसल्याच्या तक्रारी आहेत. तसेच सर्व्हर डाऊनचे अडथळेदेखील येत आहेत, अशी माहिती स्वस्त धान्य दुकानदारांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहरात २४८ स्वस्त धान्य वितरण दुकाने आहेत, तर साडेतीन लाख शिधापत्रिकाधारक आहेत. राज्यातील सर्व ग्राहकांच्या रेशनकार्डला आधारक्रमांक जोडण्यात आले आहेत. तरीही वितरणात दोन ते चार टक्क्यांची गळती असल्याचे दिसून आले आहे. हे प्रमाण १०० टक्के करण्यासाठी राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी बंधनकारक केले आहे. कार्डवरील कुटुंबातील सर्व सदस्यांनी अद्ययावत असलेले आधारकार्ड घेऊन दुकानदाराकडे गेल्यानंतर नवीन फोरजी ई-पॉस मशिनमध्ये आधार क्रमांक टाकून बोटांचे ठसे स्कॅन करून ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात निगडी, भोसरी आणि पिंपरी अशी तीन कार्यालये आहेत. या तीनही कार्यालयांतर्गत येणाऱ्या २४८ स्वस्त धान्य दुकानांमध्ये केवायसी प्रक्रिया सुरू आहे. शहरासह शहराबाहेरील नागरिकांचीसुद्धा केवायसी केली जात आहे.



> पिंपरी-चिंचवड शहरातील तीनही कार्यालयांतर्गत केवायसी प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत एकूण ६१ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ३९ टक्के शिधापत्रिकाधारकांचे केवायसी करणे बाकी आहे. ३१ मार्चपर्यंत मुदत दिलेली आहे.
>
> - प्रशांत खताळ, अन्नधान्य वितरण व पुरवठा अधिकारी

> शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ही प्रक्रिया पूर्ण करत आहेत. राज्याबाहेरील नागरिकांची केवायसी करताना अडचण येत आहे. त्यांच्या अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत. तसेच सर्व्हर डाऊनची समस्या उद्भवत आहे.
>
> - विजय गुप्ता, खजिनदार, ऑल महाराष्ट्र फेरप्राईज शॉपकिपर्स असोसिएशन

# एका विहिरीमागे 75 हजारांची मागणी; अजित पवारांचा भावकीलाच भर सभेत इशारा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना सज्जड इशारा दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती तालुक्यात सार्वजनिक विकास कामांमध्ये आणि जिल्हा परिषद, बांधकाम विभागाकडील कामांमध्ये टक्केवारी घेणाऱ्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सज्जड इशारा दिला. सार्वजनिक कामात आमच्याच भावकीतील एकजण पैसे मागत असल्याची तक्रार माझ्याकडे आली आहे. एका विहिरीमागे ७५ हजार रुपयांची मागणी होत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मी तक्रारीची नक्की शहानिशा करेन. जर का पैसे घेत असेल तर त्याचे काही खरे नाही, नसेल घेत तर शुभेच्छा. या शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कान टोचले.

बारामतीत अजित पवारांनी चक्क भावकीलाच दम भरला आहे. तालुक्यात सार्वजनिक विकास कामात आमच्याच भावकीतील एकजण पैसे मागत असल्याची तक्रार माझ्याकडे आली आहे. एका विहिरीमागे ७५ हजार रुपयांची मागणी होत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मी तक्रारीची नक्की शहानिशा करेन. जर का पैसे घेत असेल तर त्याचे काही खरे नाही, नसेल घेत तर शुभेच्छा. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना सज्जड इशारा दिला आहे.

सुजय पवार यांच्याकडून पैसे मागितले जात असल्याचे अजित पवार यांना सांगण्यात आले. त्यावरुन अजित पवारांनी जाहीर कार्यक्रमातून संजय पवार यांना इशारा दिला आहे. पंचायत समितीनजीक एका कार्यक्रमात अजित पवार बोलत होते. यावेळी अजित पवार यांना होळ येथील दीपक वाघ यांनी एक निवेदन दिले.

त्यामध्ये जिल्हा परिषदेकडून १० लाखांवरील कामांसाठीच्या निविदा मुदत उलटून गेल्यावर उघडली जात आहे. सरपंच व अधिकारी १० टक्के कमिशन घेत कामे मॅनेज करत आहेत. कार्यकारी अभियंता सुजय पवार यांच्यासह अतिरिक्त सीईओ, सहाय्यक लेखाधिकारी, टेंडर क्लार्क यांना कमिशन द्यावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच या प्रकरणी पाच फेब्रुवारीपासून जिल्हा परिषदेसमोर उपोषण करत असल्याचे म्हटले होते.

मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिकेमध्ये सदस्य होण्याची संधी कोणत्या ना कोणत्या कारणावरून पुढे गेली. ओबीसी आरक्षणा संदर्भातील महत्त्वाचा निर्णय न्यायालयाने द्यायचा आहे दरम्यान अजित पवार यांनी भर कार्यक्रमातच या निवेदनाची दखल घेत म्हणाले, मी एकच बाजू बघणार नाही, तक्रारीची शहानिशा केली जाईल. खरंच असा प्रकार घडत असेल तर कारवाई निश्चित होणार. बारामतीची आदर्श वास्तू म्हणून 'बारामती पंचायत समिती'कडे पाहिले जाते. या ठिकाणी प्रशासनाकडून काम ही त्याच दर्जाचे व्हावे अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.



### नुसता कागद वाचून चालत नाही

» बारामतीची आदर्श वास्तू म्हणून 'बारामती पंचायत समिती'कडे पाहिले जाते. या ठिकाणी प्रशासनाकडून काम ही त्याच दर्जाचे व्हावे अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली. नागरिकांचे प्रश्न सुटले पाहिजेत, नुसता दिखावा करून उपयोग नाही. खुर्चीवर बसलेल्या माणसाने हातात घेतलेल्या कागदातील माणूस ओळखला पाहिजे. नुसता कागद वाचून चालत नाही. असे सांगत पवार यांनी नागरिकांची कामे वेळेत व तत्परतेने करण्याचा सल्ला दिला.

### ओबीसींना हक्क मिळावा

» मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिकेमध्ये सदस्य होण्याची संधी कोणत्या ना कोणत्या कारणावरून पुढे गेली. ओबीसी आरक्षणा संदर्भातील महत्त्वाचा निर्णय न्यायालयाने द्यायचा आहे. आता जे आरक्षण आहे ते सर्वसाधारण मागासवर्गीय आणि आदिवासी यांच्यासाठी आहे. ओबीसींसाठी नाही. ओबीसी हा समाजातील महत्त्वाचा घटक आहे. त्यांनाही प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. तो त्यांना संविधानाने दिलेला अधिकार, हक्क आहे. मात्र याबाबतचा निर्णय लांबत आहे. आम्हाला अपेक्षा होती की, निकाल लागेल. आणि निवडणुका होतील. आम्ही त्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

# गणेश जन्म सोहळ्यानिमित्त 'श्री विघ्नहर गणपती' मंदिरात भाविकांची मोठी गर्दी !

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत फुलांचा वर्षाव करून भक्तीमय वातावरणात मोरया गोसावींची पदे म्हणत श्री विघ्नहाराचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

अष्टविनायकांपैकी श्री क्षेत्र ओझर येथे माघ शुद्ध चतुर्थीनिमित्त गणेश जयंती सोहळ्यास हजारो भाविकांच्या उपस्थितीत फुलांचा वर्षाव करून भक्तीमय वातावरणात मोरया गोसावींची पदे म्हणत श्री विघ्नहाराचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. सकाळी ४.३० वाजता मंदिर उघडण्यात येऊन श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, विश्वस्त विनायक मांडे, संतोष कवडे, शिल्पा जगदाळे व ग्रामस्थ यांनी अभिषेक करून मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले.

ठीक ७.३० वा. महाआरती संपन्न झाली. जन्मोत्सव सोहळ्याच्या शुभ दिनी महाआरतीचा मान गणेशभक्त रवीकिरण शेंडगे, प्रसाद घेगडे, मुकुंदराज वाघ, अमित पद्मावार, निखील शेळके, समीर गुद्दये, महादेव वाघ यांना मिळाला. तिथी माघ शु ४ चतुर्थी वार शनीवार दि.१ रोजी सकाळी ९ ते १२.०० वा. चौथा उत्तरद्वार अंबेराई ओझर (जगदाळे मळा) पृथ्वी- सूर्य पूजा करून संपन्न झाला. या पालखी सोहळ्यात श्री क्षेत्र ओझर येथील श्रीराम प्रसादिक भजनी मंडळ व श्री विठ्ठल प्रसार्दिक भजन मंडळ सहभागी झाले होते.

श्री विघ्नहराच्या पालखीचे स्वागत फुलाची उधळन करुन स्थानिक ग्रामस्थ यांनी केले. ठीक १०.३०. वा. श्री विघ्नहराच्या पालखीचे प्रस्थान अंबेराई मंदिरात झाले. मंदिरामध्ये गेल्यानंतर धार्मिक विधी संपन्न करून ठीक ११.०० वा. पालखी श्री क्षेत्र ओझर च्या दिशेने पालखीचे प्रस्थान झाले ठीक .११.४५ मानटांनी पालखीचे मंदिरात आगमन झाले.



मंदिरात मोरया गोसावीच्या पदांचे गायक होऊन कीर्तनकार ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील,आळंदी यांचे देवजन्माचे कीर्तन संपन्न झाले. विघ्नहर्त्या गणरायाचे मंदिर गाभारा, आवार आणि मंदिरा बाहेरील परिसरातील गणेश भक्तांच्या प्रचंड गर्दीने व श्रींच्या नामघोषामूळे परिसरातील वातावरण मंगलमय झाले होते. ग्रामस्थ, देवस्थानचे पुजारी हेरंब जोशी, विघ्नराजेंद्र जोशी, जयेश जोशी, अमय मुंगळे यांनी मोरया गोसावी पदांचे गायन केले.

देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे,सचिव सुनिल घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे, विश्वस्त प्रकाश मांडे, सुर्यकांत रवळे, गोविंद कवडे, विक्रम कवडे, समीर मांडे, विनायक मांडे, संतोष कवडे, विलास कवडे, मंगेश पोखरकर, विनायक जाधव, शिल्पा जगदाळे यांनी सोहळ्याचे उत्तम नियोजन केले होते. गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरयाच्या नोमघोषात दुपारी १२.३० वाजता श्रींचा जन्मोत्सव सोहळा पार पडला. त्यानंतर आरती घेण्यात आली.